MHPU130003572007
ज्ञानेश्वर घाटे वि. दिनकर घाटे

## नियमित दिवाणी दावा क्र. ८१/२००७ मधील
## निशाणी १ वरील आदेश

वादींनी प्रस्तुतचा दावा वाटप, कब्जा व ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. परंतु, सदर दाव्यातील वादी क्र. २ नानु दिनकर घाटे याने नि. ३२ अन्वये पुरशिस दाखल करुन त्याने दाव्यातील असणारा त्याचा हक्क सोडून दिलेला आहे. त्यामुळे वादी क्र. २ याची प्रतिवादी विरुध्द कोणतीही तक्रार नाही असे देखील नमूद केले आहे म्हणुन वादी क्र. २ चे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

२. वादी व वादीचे वकील हजर आहेत. मी प्रत्यक्ष वादी क्र. २ यास विचारणा केली असता वादी क्र. २ याने स्वेच्छेने दाव्यातील त्याचा हक्क सोडून देत आहे असे सांगितले. तसेच वादी क्र. २ ने असेही सांगितले की, त्याची प्रतिवादींविरुध्द कोणतीही तक्रार नाही त्यामुळे माझे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे. सदर पुरशिस वरील आदेशान्वये वादी क्र. २ श्री. नानु दिनकर घाटे याचे नाव दाव्यातून कमी करण्यात येत आहे. वादी क्र. १ ने मुदतीत दाव्यात दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्तप्रत अभिलेखावर दाखल करावी.

दिनांक : ११/०८/२०२१ **(श्रीमती डी. एम. पाटील)**
ठिकाण : सासवड दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word for word as per original Order.

Name of Steno : Smt. R.V.Beldar, Stenographer (Grade 3)

Court Name : Smt. D. M. Patil C.J.J.D. & J.M.F.C., Saswad.

Date of Order : 11/08/2021

Order signed by presiding officer on : 11/08/2021

Order uploaded on : 11/08/2021